दिनांक :०७/११/२०२४
बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय

# प्रेस नोट

बृहन्मुंबई शहरात अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये कार्यवाही करण्याकरीता पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती यांचे सूचनेनुसार, पोलीस सह आयुक्त (का. व सु.) श्री. सत्य नारायण यांच्या मार्गदर्शनाखाली दैनंदीन विशेष मोहिम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. मुंबई शहरातील पाचही प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त, १३ परिमंडळीय पोलीस उप आयुक्त तसेच सर्व विभागीय सहायक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्यासह पोलीस अधिकारी, अंमलदार हे एकत्रित मुंबई शहरात कार्यवाही करीत आहेत.

वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या नियंत्रणामध्ये सर्व पोलीस ठाण्यांचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गोपनीय माहितीच्या आधारे अंमली पदार्थांच्या वाहतूक, विक्री व व्यापार प्रतिबंध करुन अंमली पदार्थ मुक्त मोहिम राबविली आहे.

प्रस्तुत मोहिमेअंतर्गत मागील २४ तासात अंमली पदार्थ कायद्यान्वये अंमलपदार्थ बाळगणारे यांचेवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

| अभिलेखावरील तपासलेले आरोपी | अटक आरोपी | दाखल गुन्हे (एकुण ५) | | |
|---|---|---|---|---|
| | | एमडी | गांजा | Cocaine |
| ३१० | ५ | १ | ३ | १ |

प्रस्तुत मोहिमेअंतर्गत मागील २४ तासांमध्ये धारावी, मानखुर्द, घाटकोपर, खार व वर्सोवा पोलीस ठाणे अंतर्गत अंमलीपदार्थ कायद्यान्वये कारवाई करण्यात आलेली आहे. सदर कारवाई दरम्यान खार पोलीस ठाणे अंतर्गत १८.१ ग्रॅम Cocaine हा अंमलीपदार्थ जप्त करण्यात आलेला आहे. याशिवाय अंमलीपदार्थ सेवन करणारे यांचेवर एकुण १६ कारवाई करण्यात आली आहे. तसेच यापुढे देखील सदरची मोहिम राबविण्यात येत आहे.

तसेच **विधासनभा निवडणूक - २०२४** च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाले पासून ते अद्यापपर्यंत अंमली पदार्थ विरोधी कारवाई या शिर्षकांतर्गत करण्यात आलेल्या कारवाईमध्ये एकुण १२१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर दाखल गुन्हयांमध्ये अंदाजे रू. १,९४,९७,७२५/- किंमतीचा एकुण ७७.५३२७१ कि.ग्रॅ. ऐवढा अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेला आहे.

यावर्षी अद्यापपर्यंत मुंबई पोलीसांनी अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये एकुण ६८१० गुन्हे दाखल करुन ६७९४ आरोपींना अटक केलेली आहे.

बृहन्मुंबई शहरातील जनतेला आवाहन करण्यात येते की, अंमलीपदार्थ विक्री, सेवन किंवा वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत कार्यवाही करीता संबंधित पोलीस ठाणे तसेच बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंमलीपदार्थ विरोधी पथकाच्या ९८१९१११२२२ या हेल्पलाईन क्रमांकावर आणि मुख्य नियंत्रण कक्षातील १०० व ११२ तसेच ०२२-२२६४१७५२ या हेल्पलाईन क्रमांकावर माहिती दयावी.

* * *